# प्रकरण सहावे

# उपसंहार

**प्रास्ताविकः**

मराठी नवकथेच्या उगवतीचे एक साक्षीदार म्हणून व्यंकटेश माडगूळकरांचे नाव मराठी साहित्यविश्वात अग्रक्रमाने घेतले जाते. मोठी गुणवत्ता असलेल्या या लेखकाच्या लेखनाचे अनेकविध पैलू त्यांच्या एकूणच साहित्यातून निदर्शनास येतात. माडगूळकरांनी प्रादेशिक या संकल्पनेला परिपूर्णतेने स्पष्ट करताना मराठी साहित्यातील प्रादेशिकता ही संकल्पना नव्यानेच सर्वांना परिचयाची करून दिली. माणदेशातील माण तालुक्याच्या 'माण' नदीकाठचा परिसर हे व्यंकटेश माडगूळकरांच्या कथात्मक साहित्याचे नंदनवन बनून येताना दिसते.

माडगूळकरांनी प्रादेशिक या संकल्पनेला केंद्रस्थानी ठेवून आपल्या माणदेशी जीवनाचा इतिवृत्तांत माणदेशी मातीतून आलेल्या बोलीभाषेच्या साहाय्याने आपल्या विशिष्ट अशा निवेदन शैलीत कथन केला आहे. एकूणच माडगूळकरांच्या कथात्मक साहित्याचा प्राण असणारे घटक म्हणजे या साहित्यातून येणा-या व्यक्तिरेखा, त्या व्यक्तिरेखांना जीवंतपणे साकार करणारी भाषा, या भाषेला घडवणारा माणदेशी परिसर व या सर्वांना एकत्रपणे एक धाग्यात गुंफण्याचे काम करणारी माडगूळकरांची साधी सरळ व सोपी निवेदनशैली. याचा अभ्यास प्रस्तुत लघु-प्रबंधात, परिसर, व्यक्तिरेखा, भाषाशैली व निवेदनशैली अशी प्रकरणनिहाय विभागणी करून अभ्यास केला आहे.

या अभ्यासांती हाती आलेले निष्कर्ष प्रस्तुत प्रकरणात नोंदवावयाचे आहेत.

**'माडगूळकरांच्या कथात्मक साहित्यातून प्रकट होणारा माणदेशाचा परिसर'** या शीर्षकाखाली माडगूळकरांच्या कथात्मक साहित्यातील प्राण असणा-या परिसराचा विचार 'बनगरवाडी', 'माणदेशी माणसें', 'गावाकडच्या गोष्टी'च्या अनुषंगाने केला आहे. माडगूळकरांच्या परिसर चित्रणावर मोठया प्रमाणात चर्चा झालेली दिसून येते. या माणदेशी परिसर चित्रणानेच माणदेशच्या दाहक वास्तवतेचे चित्रण वाचकांना प्रत्यक्षरीत्या घडविले आहे. 'बनगरवाडी' या कादंबरीत येणारा परिसर तेथील दारिद्रय, दुष्काळ, धनगरी जीवन व ऋतुमानाचा लहरीपणा याचे दर्शन घडवितो. तसेच या परिसराने माणदेशी माणसाला अथंपासून इथंपर्यंत कसे घडविले, माणूस समस्यांना, संकटांना शरण न जाता संघर्ष कसा करतो, हेही या परिसरानेच त्या माणसांच्या अंगी कसे भिनवले आहे. याचा प्रत्यय येतो. त्याचबरोबर बनगरवाडीतील, ऋतुमान, धनगरांचा व्यवसाय तसेच माणदेशच्या एकूणच जीवनाचे विविधांगी दर्शन हा परिसर घडवितो. याच परिसरात जीवन जगत असताना आपली संस्कृती, रूढी-परंपरा यांना ऊराशी बाळगून माणदेशी माणूस दुःखातसुध्दा समाधान कसे व्यक्त करतो हे या परिसर चित्रणातूनच अनुभवाला मिळते.

अशाप्रकारे बनगरवाडीतून येणारा परिसर तेथील व्यक्तिजीवन त्याच बरोबर सामाजिकता, रूढी-परंपरा, यांना घेवूनच संपूर्ण कादंबरीभोवती फिरताना दिसतो.

**'माणदेशी माणसे'** व **'गावाकडच्या गोष्टीं'** या दोन कथा संग्रहाच्या शीर्षकातूनच माडगूळकरांच्या परिसर चित्रणाचा प्रत्यय येतो.

या कथा संग्रहातून माडगूळकरांनी माणदेशातील विविध खेडयांचा परिसर चित्रित केला आहे. माडगूळकर आपल्या या कथासंग्रहात कथा निवेदन करत असताना अवती-भवतीच्या परिसराला ही आपल्या लेखणीचा स्पर्श करतात व ती लेखनी त्या एकूणच परिसराचे विविधांग दर्शवते. या कथा संग्रहातून येणारे परिसर चित्रण त्या गावाला प्रत्येक्षात वाचकासमोर उभे करते. अशा या परिसर चित्रणाचा अविष्कार करताना तेथील दुष्काळ या चित्रणात प्रभावीपणे साकार होताना दिसतो. तसेच कमी पावसाचा प्रदेश असलेल्या माणदेशच्या ओसाड उजाड माळरानाचे चित्रण या कथा संग्रहात येते. या उजाड व ओसाड माळरानासारखेच तेथील लोकांचे जीवनही ओसाड व उजाड बनलेले आहे. याचाही वेध परिसर चित्रणातून माडगूळकरांची लेखनी घेताना दिसते. अशा या परिसराचा तेथील मानवीजीवनावर होणारा परिणाम माडगूळकरांनी या कथासंग्रहात साकार केलेल्या जीवनमानातून, श्रध्दा-अंधश्रध्देतून तसेच अज्ञानातून साकार होतो.

अशाप्रकारे माडगूळकरांच्या कथासंग्रहातून येणारा परिसर तेथील व्यक्तिजीवनाशी एकरूप होऊनच येताना दिसतो.

**'बनगरवाडी' तील व्यक्तिरेखा व भाषाशैली'** या दुस-या प्रकरणात माडगूळकरांच्या प्रादेशिक कादंबरीचा टप्पा समजल्या जाणा-या 'बनगरवाडी' या कादंबरीत प्रमुख असणा-या व्यक्तिरेखा व त्यांची भाषाशैलीचा विचार केला आहे.

माडगूळकरांनी 'बनगरवाडी'त साकार केलेल्या व्यक्तिरेखा, त्यांच्या स्वभाव वैशिष्टयासह संपूर्ण कादंबरीत कशा वावरतात, हे स्पष्ट होते. तसेच ही प्रत्येक व्यक्तिरेखा माणदेशच्या मातीतून कशी घडली आहे, याचा प्रत्ययही येतो. खलप्रवृत्ती, आपुलकी, प्रेमळपणा,

प्रामाणिकपणा, विश्वास या गुणांचे दर्शन या व्यक्तिरेखांच्या माध्यामातून होते. दारिद्रय, अज्ञान, अंधश्रध्दा, रूढी-परंपरा, ग्रामीण जीवनातील न्याय व्यवस्था याचेही दर्शन या व्यक्तिरेखा घडवितात. या व्यक्तिरेखांच्या तोंडून येणारी भाषा अस्सल माणदेशीपणाचा नमुना वाचकांना दाखविते. तसेच ही भाषा माणदेशातील जीवनसंस्कृती प्रभावीपणे चित्रित करते. माणदेशी जीवनातील विविध वाक्प्रचार, म्हणी, त्याच बरोबर त्यांच्या बोलीतील शिव्या बनगरवाडीच्या आशयाला समृध्द करतात. एकूणच भाषा हीच बनगरवाडीच्या जीवन आशयाचे प्रमुख अंगच बनून जाते हे स्पष्ट होते.

**'माणदेशी माणसें'मधील व्यक्तिरेखा व भाषाशैली'चा** विचार तिस-या प्रकरणात केला आहे. माणदेशी माणसांच्या विविधांगाचे दर्शन घडते माडगूळकरांनी या कथा संग्रहात धर्मा रामोशी, रामा मैलकुली, शिदा चांभार, गणा महार, नामा मास्तर या व्यक्तिरेखांच्या अनुषंगाने जातीयतेच्या रेटयाखाली या व्यक्तिरेखांचे जीवन कसे दबले गेले आहे, तसेच तांबोळयाची खाला, धर्मा रामोशाची मुलगी बजी, यासारख्या स्त्रीव्यक्तिरेखा प्रातिनिधिक स्वरूपात रेखाटून माणदेशातील स्त्रीजीवन चित्रित केले आहे. तर बन्याबापू, कोंडिबा गायकवाड, शिवा माळी, रघू कारकून, बिटा काका, या व्यक्तिरेखांतून माणदेशी माणसातील विविध स्वभावांचे कंगोरे टिपले आहेत.

या व्यक्तिरेखांच्या तोंडी येणारी भाषा तेथील मवाळकी, रंगेलपणा, जातीयता या स्वभाव वैशिष्टयांचे चित्रण करते. तसेच माणदेशतील दारिद्रय, गरिबी, लाचारपणा याचाही प्रत्यय या कथासंग्रहातील भाषा देते. झेल्या या व्यक्तिरेखेच्या मुखातून येणारी भाषा त्याचा धीटपणा व तरुणमनाचे दर्शन घडविते, तर बकसच्या

मुखातून येणारी भाषा कारुण्य, निरागसपणाचे दर्शन घडविते. एकूणच या कथासंग्रहातील भाषा कशा प्रकारच्या वैविध्यतेने नटलेली आह, याचा प्रत्यय प्रत्येक कथा वाचताना येतो.

**'गावाकडच्या गोष्टी'मधील व्यक्तिरेखा व भाषाशैली'**, या चौथ्या प्रकरणातून प्रस्तूत कथासंग्रहातील व्यक्तिरेखांची विविध वैशिष्टये, त्या व्यक्तिरेखा कशा प्रकारे साकार करतात याचा आढावा घेतला आहे. या कथा संग्रहातील नाल्या नेवरा, गणा चलपते, सोन्या साळी, बाबू म्हातरे या व यासारख्या अनेक व्यक्तिरेखा माणदेशातील बेरकीपणा, फसवेगिरी, श्रध्दाळूपणा, या स्वभावाचे बारकावे आविष्कृत करतात. तर बजा वाणीण, बयाबाई या स्त्रीव्यक्तिरेखांच्या अनुषगांने ग्रामीण स्त्रीच्या स्वभावाचे विविध पैलू कसे आहेत हे स्पष्ट होते. तर या कथा संग्रहातील ब-याच व्यक्तिरेखांच्या चित्रणातून माणदेशातील अंधश्रध्दा, रूढी, परंपरा, चालीरीती व माणदेशी संस्कृती याचा प्रत्यय येतो. त्याचबरोबर या कथासंग्रहातील अनेक व्यक्तिरेखा ग्रामीण जीवनाशी कशी नाळ जाडून आहेत, तसेच अंधश्रध्दा, अज्ञानपणा, दारिद्रय यांच्या चक्रातच कशी अडकली आहेत हे दिसून येते. तर 'कुत्री', 'विलायती कोंबडी', 'मारुतराया' या कथातून पशुप्रिय माणसांच्या वृत्ती-प्रवृत्ती स्पष्ट झाल्या आहेत.

या कथासंग्रहातून येणारी भाषा त्या त्या व्यक्तिरेखेला समर्थपणे पेलताना दिसते. या व्यक्तिरेखांच्या तोंडी येणारी भाषा त्या व्यक्तीच्या स्वभावाला प्रत्ययकारीतेने आविष्कृत करते. तसेच ही भाषा माणदेशी बोलीला वेगवेगळया अंगाने तिच्यातील बारकाव्यासहित चित्रित करते.

**'व्यंकटेश माडगूळकरांची निवेदनशैली'** या पाचव्या प्रकरणात ज्या निवेदनशैलीने माडगूळकरांचे नाव साहित्यविश्वात कोरले त्या शैलीच्या

विविधतेचा विचार केला आहे. माडगूळकरांची साधी, सरळ निवेदनशैलीच या कथात्मक साहित्यातील घटना, प्रसंग व बोलीभाषा यांची बेमालूपणे सांगड घालण्यास प्रमुख आधार ठरलेली आहे. माडगूळकरांनी 'बनगरवाडी', 'माणदेशी माणसें' व 'गावाकडच्या गोष्टी' या कथात्मक साहित्यातून निसर्ग चित्रण, व्यक्तिचित्रण आणि घटना प्रसंग चित्रण अशा विविध स्वरूपात निवेदन केले आहे. आपल्या निवेदन कौशल्याच्या जोरावर माडगूळकरांनी माणदेशातील निसर्गाला, तेथील परिसराला, प्रभाविपणे रेखाटले आहे. तसेच आपल्या निवेदनशैलीद्वारे माणदेशातील विविध व्यक्तींच्या वृत्ती-प्रवृत्तीवर प्रकाश टाकला आहे. त्याच बरोबर माडगूळकरांनी माणदेशी समाजजीवनात घडणा-या विविध प्रसंगावर प्रत्ययकारी असे निवेदन केलेले आहे. त्यांच्या एकूणच निवेदनशैलीने माडगूळकरांची माणदेशी मातीशी जुळलेली नाळ वाचकांना उलघडून दाखविली आहे. या निवेदनशैलीने एकूणच मराठी साहित्यविश्वाला एका वेगळया आणि नावीन्यपूर्णतेने बहरलेल्या निवेदनशैलीचे दर्शन घडविले असेच म्हणता येईल.

अशाप्रकारे व्यंकटेश माडगूळकरांच्या साहित्याने मानवीजीवनातील बारकाव्यांचे चित्रण करून मराठी साहित्यविश्वाला घडविले, तसेच माणदेशी बोलीने मराठी भाषा वैभवात मोलाची भर घातली आहे, असे म्हणता येईल.

# संदर्भसूची

## आधारग्रंथ


१. माडगूळकर व्यंकटेश :'गावाकडच्या गोष्टी'
उत्कर्ष प्रकाशन, पुणे.
७वी आवृत्ती ऑगस्ट २००१

२. माडगूळकर व्यंकटेश :'बनगरवाडी'
मौज प्रकाशनगृह, मुंबई
१९वी आवृत्ती मार्च २००६

३. माडगूळकर व्यंकटेश :'माणदेशी माणसें'
कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे.
प्रथमावृत्ती-१९४९


## संदर्भग्रंथ


१. अदवंत म.ना. :'प्रदक्षिणा'
कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे.
सातवी आवृत्ती.

२. शेवडे इंदुमती :'मराठी कथा उद्गम आणि विकास'
सोमया प्रकाशन, मुंबई.
प्रथमावृत्ती १९६४

३. गाडगीळ गंगाधर :'खडक आणि पाणी'
पॉप्युलर प्रकाशन, पुणे.

तृतीयवृत्ती १९८५

४. चवरे रा.गो. :'मराठी कथाः प्रवृत्ती आणि प्रवाह'
मराठी साहित्यपरिषद, अमरावती.
प्रथमावृत्ती १९९५

५. जोग ल.ग. :'कादंबरी'
चिरंजीव ग्रंथ प्रकाशन, पुणे.

६. जोशी सुधा :'कथाः संकल्पना आणि सामिक्षा'
मौज प्रकाशन, मुंबई.
प्रथमावृत्ती २०००

७. ठाकूर रवींद्र :'कादंबरीकार र.वा.दिघे'
मेहता पब्लिशिंग, पुणे.
प्रथमावृत्ती १९९५

८. ठाकूर रवींद्र :'मराठी ग्रामीण कादंबरी'
स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे.
द्वितीयवृत्ती २००१

९. तारो अ.रा. :'आधूनिक मराठी ललित वाङःमय प्रादेशिकता'
उद्‌गम आणि विकास,
अप्रकाशित.

१०. संपा-पवार गो.मा. :'ओझं'
साकेत प्रकाशन, पुणे.
प्रथमावृत्ती १९८७

११. संपा-पवार गो.मा. आणि :'मराठी साहित्य प्रेरणा व

हातकणंगलेकर म.द. स्वरूप'
पॉप्यूलर प्रकाशन, मुंबई.
पहिली आवृत्ती १९८६

१२. पवार गो.मा. :'साहित्यमूल्य आणि अभिरुची'
साकेत प्रकाशन, औरंगाबाद.
प्रथमावृत्ती, १९९४

१३. बापट प्र.वा. आणि गोडबोले ना.वा. :'मराठी कादंबरीः तंत्र आणि विकास'
व्हिनस प्रकाशना, पुणे.
दुसरी आवृत्ती १९५७

१४. बालशंकर देशपांडे :'कादंबरी विवेचन आणि विश्लेषण'
स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, पुणे.
प्रथमावृत्ती १९९८

१५. माडगूळकर व्यंकटेश :'माणदेशी माणसें':(प्रवास एका लेखकाचा)
मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई.
प्रथमावृत्ती १९९४

१६. माडगूळकर व्यंकटेश :'गावाकडच्या गोष्टी'
उत्कर्ष प्रकाशन, पुणे.
दुसरी आवृत्ती

१७. माडगूळकर व्यंकटेश :'हस्ताचा पाऊस'
उत्कर्ष प्रकाशन, पुणे.
प्रथमावृत्ती १९६५

१८. मुलाटे वासुदेव :'ग्रामीण कथाः स्वरूप आणि विकास'
स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद.
द्वितीयवृत्ती २००५

१९. यादव आनंद :'ग्रामीण साहित्यःस्वरूप आणि समस्या'
मेहता पब्लिशिंग, पुणे.

२०. संपा-हातकणंगलेकर म.द. :'व्यंकटेश माडगूळकर', 'माणदेशी माणूस' आणि 'कलावंत'
शब्द प्रकाशन, सातारा.
प्रथमावृत्ती मे २०००

**नियतकालिके**

१. 'नवभारत'
ऑक्टो/सप्टे १९५५-५६

२. 'प्रतिष्ठान' कादंबरी समीक्षा विशेषांक' मराठवाडा साहित्य परिषद, औरंगाबाद. १९८१

३. 'वैखरी'
ए.मे.जू.जु.ऑ.सप्टें. १९७२

891.463
DOR
T15444